MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

International Multilingual Research Journal

# VIDYAWARTA®

Issue-18, Vol-11, April to June 2017

Editor
Dr.Bapu G. Gholap



Shri Ganesh Warpudkar ACS College Sonpeth Dist.Parbhani

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

27) डिजिटल ग्रंथालय : आधुनिक काळाची गरज
प्रा. सय्यद समीना नबीसाब, जि. उस्मानाबाद || 117

28) म.बसवेश्वर : धर्मसुधारक व आद्य समाजसुधारक
प्रा.डॉ.सोमवंशी मुक्ता (गंगणे), जि.परभणी || 121

29) लोककवी वामनदादा कर्डक यांच्या गीतातील आंबेडकरी जाणीवा
प्रा. डॉ. तुळशीराम चंद्रसेन उकिरडे, उस्मानाबाद || 125

30) दलित आत्मकथनांमधील सामाजिक जाणीव
डॉ. वासुदेव सोमाजी वले, जि. जळगांव || 129

31) गावाच्या विकासामध्ये महात्मा गांधी तंटा मुक्त गाव अभियानाचे योगदान
प्रा. कु. नंदा लखनलाल लिमकर, अदासी गोंदिया || 132

32) महाराष्ट्र राज्यातील जलसिंचनाची स्थिती (सन २०००—०१ ते २००९—२०१०)
प्रा. डॉ. पी. डी. जाधव, उमरखेड || 136

33) खेड तालुक्यातील (पुणे जिल्हा) प्राकृतिक घटकांचे भौगोलिक माहिती प्रणालीच्या अधारे विश्लेषण
प्रा. दिलीप ज्ञानेश्वर मुळूक, खेड || 139

34) नांदेड जिल्हयातील अनुदानित महाविद्यालयीन ग्रंथालयात सिक्स सिग्मा या तंत्राची परिणामकारकता
श्री. धनंजय एल. मोतेवार, डॉ. सौ. शालीनी एम. साखरकर, जि. नागपूर || 145

35) हिंगोली जिल्ह्यातील विज्ञान विषयाचे अध्यापन करणाऱ्या प्राध्यापकांच्या वाचन अभिरुची : एक अभ्यास
सिद्दीकी नईम अहेमद, डॉ. सौ. शालीनी एम. साखरकर, जि. नागपूर || 147

36) 'पचपन खम्भे लाल दीवारें' उपन्यास में व्यक्त मध्यवर्गीय महिलाओं की दशा और दिशा
डॉ. संदीप श्रीराम पाईकराव, नांदेड़ || 151

37) उत्तर प्रदेश में किसान आन्दोलन
प्रीति, वाराणसी || 154

38) आतंकवाद के प्रतिरोध में साहित्य का उभरता स्वर
डॉ. सुरेश सिंह राठौड़, अजमेर (राज.) || 156

39) ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम और स्वास्थ्य
Dr. Madhu Sisodia, Varanasi || 160

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Dist.Parbhani

नियंत्रण असते. त्यासाठी Digital Watermarking पध्दतीचे तंत्रज्ञान वापरले जाते.

दोन ग्रंथालयातील सुचीबध्द माहिती देवाण—घेवाणीसाठी आंतराष्ट्रीय दर्जाच्या नियमावलीचा (Protocol)- उदाहरणार्थ, Z 39.50 वापर केला जातो.

डिजिटल ग्रंथालय हे बहुतांशी इन्ट्रानेटवर उपलब्ध होते. एक्स्ट्रानेटव्दारे ते बाहेरून वापरता येते.

त्याचप्रमाणे वेगवेगळया डिजिटल ग्रंथालयांच्या विविध सर्व्हरमधील माहिती उपलब्ध करूनही ती वापरण्याचे तंत्रज्ञान वापरले जाते.

- **समारोप:—**

अशा प्रकारे आज माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये डिजिटल ग्रंथालये ही काळाची गरज आहे. डिजिटल ग्रंथालयाच्या माध्यमातुन वाचकांना हवी असलेली माहिती लवकरात लवकर मिळू शकते. आजच्या आधुनिक युगात वाचकांच्या तसेच संशोधकांच्या गरजा वाढत चालल्या आहेत. त्यांच्या गरजा पांरपारीक ग्रंथालये पुर्ण करू शकत नाहीत. त्यामुळेच आज डिजिटल ग्रंथालयांची गरज भासली आहे. ओपॅक, अंतरग्रंथालयीन देवाण—घेवाण ई. सेवांच्या माध्यमातून डिजिटल ग्रंथालये वाचकांना कमी वेळात हवी असलेली माहिती पुरवत आहेत.

- **संदर्भ ग्रंथ:—**

१. ग्रंथालय व माहितीशास्त्र — एस.पी. पवार, आर.जी. पवार व इतर. फडके प्रकाशन — कोल्हापूर.

२. ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण — द.ना. फडके. युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे.

३. पानगे बी.एम., २००२, डिजिटल ग्रंथालय, नाशिक, ज्ञानगंगोत्री, पृष्ट ३४—३६

❑❑❑

**28**

# म.बसवेश्वर : धर्मसुधारक व आद्य समाजसुधारक

**प्रा.डॉ.सोमवंशी मुक्ता (गंगणे)**
लोकप्रशासन विभाग प्रमुख,
कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ जि.परभणी

**********

भारतात बाराव्या शतकात निरनिराळ्या भागात थोर संत, महंत, ज्ञानी, विचारवंत, व महात्मे होऊन गेले. त्यांनी पुर्णपणे मानवतावादी धोरण आखून समाज परिवर्तनाच्या कार्याचा पाया घातला. भारतातल्या धार्मिक जीवनातील विषमता आणि कर्मकाडांमुळे आपल्याच बांधवांना पशुतुल्य वागणूक दिली जात असे. माणसाचे श्रेष्ठत्व गुणवत्तेवर न ठरता जन्मावर ठरविले जात असे. त्यात भरीस भर म्हणून उत्तरेकडून इस्लाम धर्म येत होता, तर पश्चिमेकडून ख्रिस्ती धम्र प्रसारकांचा प्रभाव वाढत होता. यामुळे भारतीय समाज गोंधळून गेला होता. गौतम बुध्दांने पेटविलेली ज्ञानाची, समतेची व न्ययाची मशाल हिंदू धर्मातील चार्तूरवर्णपध्दती व जातीवादी समाज रचनेत मंदावली होती. अशा परिस्थितीत महात्मा चक्रधर, महात्मा बसवेश्वर, गुरूनानक, संत कबीर यांनी नवजागृतीची आणि धर्मसुधारणेची जोरदार चळवळ चालू केली. या चळवळीमुळे सारा समाज ढवळून निघाला. वर्ण श्रमधर्माला पूर्णपणे विरोध व जन्मावर आधारलेले जातिभेद न मानता धार्मिक समानतेचा पुरस्कार केला आणि प्रत्यक्षात तसे वागूण दाखविले. स्त्रियांना समान वागणूक दिली. या महापुरूषांची धर्मविषयीची तत्वे समान होती. हे सर्व महात्मे मावतावादी होते. सर्वांभूती परमेश्वर पाहण्याची त्यांची दृष्टी होती.

`म.बसवेश्वर कर्नाकटातील संत व समाजसुधारक होते. त्यांनी हिंदू धर्मामील जातिव्यवस्थे विरूध्द व अन्य हानिकारक प्रथांविरूध्द संघर्ष केला. सर्व धर्म समभाव जोपासणाऱ्या बसवेश्वरांनी बाराव्या शतकात सर्व कनिष्ठ व उच्च जातीतील लोकांना वीरशैव लिंगायत धर्मात प्रवेश दिला. स्त्री शिक्षणाचा पुरस्कार, वारांगणांचे पुनर्वसन

† Äë üÖÖèë[१]

**संशोधन पध्दती**

तथ्यसंकलन - प्रस्तूत शोधनिबंध लिहिण्यासाठी दुय्यम साधनसामग्रीच्या आधारे तथ्यसंकलन करण्यात आले आहे. यामध्ये

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth


संदर्भ ग्रंथ, मासिक, इंटरनेटवरील लेख यांचा आधार घेण्यात आला आहे.

**उद्देश :-**

१) वीरशैव धर्मसंस्थापक बसवेश्वर महाराजाच्या चरित्राचा अभ्यास करणे.

२) वीरशैव धर्म स्थापनेचे कारणे शोधणे.

३) म.बसवेश्वरांच्या सामाजिक सुधारणांचा आढावा घेणे.

४) वीरशैव धर्मांच्या वर्तमान स्थितीचा अभ्यास करणे.

**गृहितकृत्य :-**

वर्तमान वीरशैव धर्मातील लोक म.बसवेश्वरांचा धर्म प्रसाराचा उद्देश व कांही तत्वाचे पालन करताना दिसून येत नाहीत.

**• जीवन चवित्र**

म.बसवेश्वरांचा जन्म प्रतिष्ठित ब्राम्हण कुटूंबात १२ व्या शतकात १३ मे ११३१ मध्ये झाला. ब्राम्हण कुटूंबात जन्मास आलेले म.बसेवश्वर अन्य मुलांप्रमाणे स्वैर हुंदडण्यात आणि खेळण्यात कधीच रमले नाहीत. ते अतिशय चौकस बुध्दीचे होते. ते विचारी आणि चिंतनशील असल्यामुळे सतत मुग्ध असत. आठव्या वर्षी मौजीबंधन करण्याचा योग आला. त्यावेळी इतक्या अल्प वयातदेखील त्यांनी मुंज करून घेण्यास स्पष्ट नकार दिला.[२] यानंतर ते आपल्या मोठ्या बहिणीसोबत (नागलांबिका) इंगळेश्वर - बागेवाडी गाव सोडून कुडलं संगम या क्षेत्री आले. श्री जतदेव मुनींच्या आश्रमात राहून संगमेश्वर देवाची आराधना केली.

म.बसवेश्वर हे प्रचंड ज्ञानी, मितभाषी, प्रसन्न चेहरा विनम्र स्वभाव आणि मधूर बोलणे या गुणांमुळे सर्वांच्या ऱ्हदयी वास करू लागले. त्यांची खाती सर्वदूर परसली. `त्यावेळी मंगळवेड्यात चालुक्य राजाचा सामंत म्हणून राजा बिज्जळ राज्य करीत होता. त्या राजाच्या पदरी बसवेश्वरांचे मामा दंडाधिकारी म्हणून नोकरी करीत होते. त्यांची कन्या गंगाबिका हिच्याशी म.बसवेश्वरांचा विवाह झाला. विवाहानंतर म.बसवेश्वर मंगळ वेढ्यातच राहू लागले. यामुळे बसवेश्वरांचे तत्वज्ञान त्याकाळी महाराष्ट्र, कर्नाटक यांना जोडणारा दुवा ठरले.`

राजे बिज्जळ म.बसवेश्वरांची किर्ती ऐकूण प्रसन्न झाले व बसवेश्वरांना सरकारी सेवेत सामावून घेतले. बसवेश्वरांच्या गुणवैशिष्ट्यामुळे राज्याने आपली बहिण निलांबिकाचा विवाह बसवेश्वरांसोबत करून दिला. त्यांचा हा विवाह आंतरजातीय विवाह होता. तसेच बसवेश्वर हे राजघराण्याशी जोडले गेले. यामुळे त्यांना धर्मसुधारणा व सामाजिक सुधारणा करणे अधिक सोपे झाले.

म. बसवेश्वरांनी चार्तुवर्ण्याला व जातीव्यवस्थेला तडा देत समाजात समता व न्याय प्रस्थापित करण्यास सुरूवात केली. त्यांचे विचार समाजात रूजू लागले. कर्नाटक, महाराष्ट्र आणि तामिळनाडूतही त्यांच्या विचारांचा प्रसार झाला. बसवेश्वर हे बिज्जळ राजाचे प्रधान होते. कारभाराच्या बाबतीत बसवेश्वर अतिशय निष्ठावान आणि प्रमाणिक होते. त्यामुळे त्यांच्याविरूध्द बोलण्याची कोणाची हिंमत होत नसे. परंतू त्यांच्या विचारसणीमुळे चार्तुवर्ण्य पध्दतीच्या समर्थकामध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला. सनातन्यांचे पित्त खळवळू लागले. त्यात बसवेश्वरांनी ब्राम्हणांच्या मुलीचे लग्न चांभाराच्या मुलाशी लावून दिले. यामुळे मोठे वादळ उठले. सनातनी लोकांशी राजा बिज्जळांवर दबाव आणला. यामुळे राजाने बसवेश्वरांना प्रधानपदाचा त्याग करून कल्याण नगरी सोडून बाहेर जाण्याची आज्ञा केली. त्याचवेळी बसवेश्वरांनी आपल्या डोक्यावरचा प्रधानपदाचा मुकूट खाली उतरून राजासमोर ठेवला. त्यांनी कायमची कल्याणनगरी सोडली आणि विजापूर जिल्ह्यातील कुंडल संगम श्रेत्री तेथे निघून गेले म. बसवेश्वरांनी इ.स. ११६८ साली कुंडल संगम श्रेत्री समाधी घेतली.

**• वीरशैव धर्म स्थापनेची कारणे :-**

भारतात रामराज्यापासूनच धर्मांच्या आधारे विषमतेला खतपाणी मिळत गेले. याचा एक रामायणातील महत्वपूर्ण असा संदर्भ देता येतो. रामाने सतिला वणवसात पाठविले कारण एका धोब्याने आपल्या पत्नीशी भांडत असतांना म्हटले ``पळवून नेलेल्या सितेला रामानी आपल्या राजमहलात परत घेतले, पण मी तुला परत स्वीकारणार नाही`` हे वचन सेवकाने रामाला कथन केले. त्यावेळी जनतेच्या मताचा विचार करून रामाने सितेचा त्याग केला असे म्हटले जाते. त्या संदर्भातून त्याकाळात जातीव्यवस्था होती. तसेच स्त्रीयांना आपले मत मांडण्याचा अधिकार नव्हता हे स्पष्ट होते. १२ व्या शतकामध्ये तर चातुवर्ण व्यवस्था व जातीव्यवस्था यामुळे समाजात मोठ्या प्रमाणावर अन्याय होत होते. महिलांना शिक्षणाचे अधिकार नाकारले होते विषमता प्रचंड प्रमाणात वाढली होती. या पार्श्र्वभूमीवर म.बसवेश्वरांनी वीरशैव धर्मांची स्थापना व प्रसार करण्याचे महान कार्य केले.

**१) चार्तुवर्ण पध्दती :-**

भारतात त्याकाळी चार्तुवर्ण पध्दती होती. ती म.बसवेश्वरांच्या मानवतावादी दृष्टिकोणातून अयोग्य होती. यामुळे म.बसेवश्वरांनी सर्व मानवजातीला सामावून घेणारा धर्म असायला हवा, असा विचार मांडला. त्यावेळी जातीवरून व्यक्तीची ओळख होत असे. परंतु बसवेश्वरांनी मात्र जातीपेक्षा कर्म श्रेष्ठ मानले. जातीव्यवस्था व चार्तुवर्ण्याला विरोध करून वीरशैव धर्मांची स्थापना करून त्यांत स्त्री-पुरूष व सर्व उच्चनिच जातीच्या व्यक्तींना समाविष्ठ करून घेतले.

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
UGC Approved Sr.No.7180
Vidyawarta®
April To June 2017
Issue-18, Vol-11

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Dist. Parbhani

२) स्त्री-पुरूष विषमता :-

१२ व्या शतकात स्त्रीयांना अतिशय गौण स्थान देण्यात आले. त्यांना कोणत्याही प्रकारचे अधिकार नव्हते. शिक्षण, धर्म-उपासना, मंदीर प्रवेश यापासून महिलांना वंचित ठेवले होते. बसवेश्वरांच्या मुर्जीच्या प्रसंगी त्यांनी आपल्या वडिलांना अनेक प्रश्न विचारले त्यातील एक मत्वाचा प्रश्न म्हणजे, ``केवळ मुलाचीच का बरे मुंज लावायची? मुलींनी यज्ञोपवीत धारण करून विद्यार्जन का करायचे नाही ?[३]`` यावर वडिलांना त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देणे कठिण होत असे. म्हणून त्यांनी सांगून टाकले की ``आपल्या पुरातन शास्त्रग्रंथामध्ये स्त्रियांनी जानवे घालावे असे म्हटलेले नाही``[४]. अशा उत्तरांनी बसवेश्वरांचे समाधान झाले नाही. त्यांना अनेक प्रश्न पडत व वडिलधाऱ्यांना विचारत असत. जसे हे आपले सारे वर्तन स्त्री - पुरुष यांच्यातील भेदभाव वाढविणारे नव्हे काय ?``[५] त्यांच्या या प्रश्नातून असे स्पष्ट होते की ते समाजाचे डोळसपणे निरीक्षण करीत होते. त्यांना समाजातील स्त्रीयांना मिळणारी वागणूक अयोग्य व अन्यायकारक वाटत होती. म्हणून त्यांनी वीरशैव धर्माची स्थापना करून महिलांना पुरूषांच्या बरोबरीने सर्व अधिकार दिले.

थोडक्यात म.बसवेश्वरांनी समाजातील विषमता नष्ट करण्यासाठी धर्मसुधारणा घडवून आणण्याचे महत्वपूर्ण कार्य १२ व्या शतकात केले. यासाठी त्यांनी वीरशैव धर्माची स्थापना करून सर्वांना कोणताही भेदभाव न करता धर्म उपासणा करण्याचे अधिकार मिळवून दिले. यासाठी त्यांनी आपल्या घराचा त्याग केला.

**म.बसवेश्वरांच्या सामाजिक सुधारणा :-**

छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांप्रमाणेच महात्मा बसवेश्वर हे कृतीशील क्रांतीकारक होते. महात्मा बसवेश्वरांची तुलना २१ व्या शतकातील डॉ.नरेंद्र दाभोळकर यांच्याशी करता येईल. महात्मा बसवेश्वर अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे होते. त्यांनी १२ व्या शतकात अनेक महत्वपूर्ण सामाजिक सुधारणा घडवून आणल्या.

**१) सामाजिक समता :-**

म.बसवेश्वरांच्या काळात सामाजात प्रचंड प्रमाणात विषमता वाढली होती. या देशात चार्तुवर्ण पध्दतीनूसार कांही लोकांना गावकूसाबाहेबर राहावे लागत असे व त्यांना चांडाळ असे म्हटले जात असे. त्यांना सन्मानाचे जीवन जगता यावे यासाठी वीरशैव धर्माच्या आधारे सर्वांना समान अधिकार प्रदान केले. तसेच स्त्री-पुरूष समता प्रस्थापित करून स्त्रीयांना सर्व अधिकार वीरशैव धर्मानूसार बहाल केले.

**२) जातीभेदांची समाप्ती :-**

म.बसवेश्वरांनी जातीनुसार मिळणारा जन्म व खालच्या जातीतील लोकांना मिळणारी वागणूक यावर प्रहार केला. त्यांच्यामते जात श्रेष्ठ नसून व्यक्तीचे कर्म श्रेष्ठ आहेत. असा संदेश समाजाला दिला. वीरशैव धर्मात उच्च-निच सर्व कनिष्ठ जातींना दीक्षा दिली.सर्वांना समान अधिकर दिले, म.बसवेश्वर हे `देवालयापेक्षा देहालयाचे प्रतिपादन करणारे मध्ययुगातील सर्वश्रेष्ठ संत होते`[६] त्यांनी समाजातील जातीभेद नष्ट करण्यासाठी कर्नाटक ते महाराष्ट्र असा प्रवास केला व वीरशैव धर्माच्या प्रसाराने जातीभेद नष्ट करण्याचे काम १२ व्या शतकात राजेशाही व्यवस्थेच्या कालखंड केले.

**३) अस्पृश्यता निवारण :-**

शास्त्रीपंडितांनी बहूजन समाजाच्या विकासाची सर्व दारे बंद करून टाकली होती. `या मंडळीनी आर्थिक, सामाजिक आणि धार्मिक दृष्टीने बहुजन समाजाला छळले होते. भक्ती आणि नामस्मरण करण्याचाही अधिकार त्यांना नव्हता. रामायण काळापासून हे चालत होते. शंभूक नावाचा अस्पृश्य तपश्चर्येला बसला म्हणून त्यावेळच्या ब्राम्हणांनी रामाकडे तक्रार केली. या विपरीत प्रकारामुळे एका ब्राम्हणच्या मुलाचा अपमृत्यु झाला असेही सांगण्यात आले. त्यामुळे रामाने बाण मारून शंभूकाचा वध केला. याचा अर्थ ब्राम्हणेतरांनी ज्ञानप्राप्तीसाठी प्रयत्न करू नये असा झाला. तीच परंपरा चालू होती`[७] याविरूध्द म.बसवेश्वरांनी बंड पुकारला व अशा धर्माची स्थापना केली की, त्या धर्मात अस्पृश्यतेला थोडाही थारा नव्हता.

**४) श्रमनिष्ठा :-**

म.बसवेश्व हे शिवाची भक्ती करत असत. परंतु त्यांच्या मते इष्टलिंगपुजा म्हणजेच शिवची उपासना नसून इष्टलिंगाच्या पुजेबरोबरच माणुसकी, दया, क्षमा, शांती, समता, सत्य, करूणा, शील आणि सौजन्य इ. गुणांचा अंगीकार आवश्यक असल्याचे सांगत. तसेच `श्रम हाच खरा स्वर्ग` हे त्यांचे प्रसिध्द वचन होते. मानवी विकासाचा मार्ग श्रम आहे. ही धारणा समाजाच्या गळी उतरविण्याचे कार्य बसवेश्वरांनी केले.

**५) बालविवाहास विरोध :-**

म. बसवेश्वरांनी १२ व्या शतकात सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी समाजातील घातक प्रथांना विरोध केला. त्यापैकी एक महत्वाची प्रथा म्हणजे बालविवाह म. बसवेश्वरांनी बालविवाहाला विरोध केला. त्याच बरोबर समाजातील प्रत्येक स्त्री-पूरूषाला शिक्षण घेऊन स्वत:चा विकास करण्याची संधी वीरशैव धर्माची दीक्षा देवून उपलब्ध करून दिली.

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth


**६) विधवांच्या पुनर्विवाहाला मान्यता :-**

१२ व्या शतकात महिलांची स्थिती अतिशय दैनिय होती. लोकसंख्येमध्ये निम्म्याने असलेल्या स्त्रीयांना कसलेच अधिकार नव्हते. त्यांना दासी, गुलाम म्हणून जगावे लागत असे. त्यांना स्वत:साठी कोणताही निर्णय घेण्याचा अधिकार नव्हता. बालपणी झालेला विवाह यातून अनेक स्त्रियांना तारूण्यांत वैधव्याचे जीवन जगावे लागत असे. त्यांना पुनर्विवाह करण्याचा अधिकार नव्हता. म.बसवेश्वरांनी विधवांच्या पुनर्विवाहाला मान्यता दिली.

महात्मा बसवेश्वरांनी १२ व्या शतकात महान कार्य करून समाजातील सामान्य जनतेला स्वातंत्र्य, समता व बंधूता या तत्वाची माहिती दिली. त्यांनी मानवतावादी धर्माची स्थापना केली. त्यांनी दलितांना चांगले जीवन जगण्यासाठी प्रोत्साहित केले. दलितांनी लिंगदीक्षा घेतली. बसवेश्वरांनी या माध्यमातून अस्पृश्यता नष्ट करण्यावर भर दिला.

आपल्या धर्मप्रसारातून त्यांनी समाजाला चांगली शिकवण दिली. जंगमभक्ती अर्थात समाजसेवा केल्याशिवाय, तण, मन, धन अर्पण केल्याशिवाय केवळ लिंग भक्ती करणे निरर्थक आहे. बसवप्रज्ञा म्हणजे जातिभेद, लिंगभेद, वर्णभेद आणि कुळभेद मिटवणे व मानव धर्माचा स्विकार करणे होय. असा त्यांचा उद्देश होता, प्रतिज्ञा होती.

**वीरशैव धर्माची वर्तमान स्थिती :-**

महाराष्ट्रात वीरशैर (लिंगायत) धर्मांचे लोक बहुतेक ठिकाणी वास्तव्यास असलेले दिसून येतात. गाव आणि शहरातून ह्या धर्मातील लोक आढळून येतात. अगदी लहानपणापासून वीरशैव धर्मांच्या लोकांच्या संपर्कात आल्यामुळे या आधुनिक वीरशैव धर्मीय लोक आणि म.बसवेश्वरांनी आपल्या धर्म तत्वज्ञनात मांडलेली तत्वे यामध्ये काहीवेळा विरोधाभास पाहावयास मिळतो.

**कर्मकाडांना महत्व :-**

म.बसवेश्वरांनी देवालयापेक्षा देहालयास महत्व दिले. परंतु वर्तमान स्थितीत लिंगायत धर्मात कर्मकांडाना महत्व दिले जात आहे. शिवभक्ती शिवाय वेगवेगळ्या देवतांच्या पुजा करणे, सप्ताह साजरे करणे, सोवळे पावळे, ज्या पुजा हिंदू धर्मात केल्या जातात त्या लिंगायत धर्मातील लोकही करतांना दिसून येतात. म.बसवेश्वरांनी कोणतीही जात पाहिली नाही. सर्वांना समान अधिकार दिले. सर्वांना एका छत्राखाली आणून समता स्वातंत्र्य व बंधूता या तत्वाचा प्रसार करण्याचा प्रयत्न केला. पण आज २१ व्या शतकात मात्र दीक्षा घेतलेली व्यक्ती दुसऱ्या जातीच्या लोकांच्या घरी चहा -पाणी सुध्दा घेत नाही अपवाद आहेत. माझा स्वत:चा अनुभव आहे. वाणीसमाजाच्या घरी गॅसची शेगडी व पोळपाट लाटणे बाटेल म्हणून त्याला स्पर्श करू दिला नाही. आज म.बसवेश्वर महाराजांच्या चरित्राचा अभ्यास करतांना माझ्या जीवनातील कांही घटना मला सहजच आठवू लागल्या. म.बसवेश्वरांनी १२ व्या शतकात अस्पृशता निवराणासाठी समाजातील विषमता नष्ट करण्यासाठी आपल्या माता-पित्यांचा त्याग केला. वीरशैव, मानवतावादी धर्माची स्थापना करून त्याचा कर्नाटकासह महाराष्ट्रात प्रसार केला. परंतु आज विज्ञान युगातील लोक मात्र त्यांच्या या उपदेशाकडे डोळसपणे पाहतांना दिसून येत नाहीत. माणूस कर्माने आणि ज्ञानाने मोठा होतो. आनुवंशिकतेने किंवा जातीने नाही हे तत्वज्ञान स्पष्टपणे मांडलेले आहे. म्हणूनच बसवेश्वरांना साथ देण्यासाठी स्पृश्य-अस्पृश्य जातीतील अनेक शरण (संत) पुढे आले. त्यामध्ये चन्नबसवेश्वर ब्राम्हण, ढोर कक्कय्या, मांग मादर चन्नया, चांभार हरळ्या, सोनार बोमय्या, धोबी माचीदेव, नावाडी चोडय्या, तेली कन्नया, मेंढपाळ गोल्लाळ, महार शिवनागमय्या अशी कितीतरी शरणांची नावे सांगता येतील`[८] यावरून असे स्पष्ट होते की, म.बसवेश्वरांनी आठरापगड जातीच्या लोकांना एकत्र करण्यासाठी वीरशैव धर्माचा आधार घेतला व सामाजिक परिवर्तन घडवून आणले.

``कर्नाटकात वीरशैव लिंगायत धर्म हा येथील बहुजन समाजाचा धर्म आहे. धर्मगुरू आहेत. त्यांचे मठ आहेत, मठांची परंपरा चांगली आहे. विशेषत: शैक्षणिक क्षेत्रात या धर्माच्या गुरूंनी केलेले कार्य अविस्मरणीय आहे. पण सामाजिक क्षेत्रात त्यांनी बसवेश्वरांनंतरच्या आठशे वर्षात फार मोठी प्रगती केली आहे असे आजच्या परिस्थितीत तरी म्हणण्याचे धाडस कोणी करणार नाही``[९] या धर्मातच आज जातीच्या भिंती उभारण्यात आलेल्या दिसतात.

**गृहितकृत्याची पडताळणी :-**

प्रस्तूत शोधनिबंधासाठी मांडण्यात आलेले गृहितकृत्य `वर्तमान वीरशैव धर्मातील लोक म.बसवेश्वरांचा धर्म स्थापनेचा उद्देश व कांही तत्वांचे पालन करतांना दिसून येत नाही` या शोधनिबंधातील स्पष्टीकरणाद्वारे सत्य सिध्द होते.

**निष्कर्ष :-**

म.बसवेश्वरांनी व त्याकाळातील अनेक संतांनी समाजपरिवर्तनासाठी प्रयत्न केले. समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. परंतु आपेक्षित बदल समाजात घडून आले नाहीत. त्याकाळी ज्या संतांनी कार्य केले त्यांनाही आज जातीमध्ये विभागले गेले आहेत. गोरोबा कुंभार, चोखोबा महार, नरहरी सोनार, अर्थात बसवेश्वरांना आपेक्षित असलेली जातीनिर्मूलनाची प्रक्रिया झालेली दिसून येत नाही. आधुनिक युगामध्ये म.ज्योतीबा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, यांनी अस्पृशांना स्पृश्यांच्या बरोबरीने हक्क मिळवून देण्यासाठी लढा दिला.

MAH MUL/03051/2012 ISSN: 2319 9318 UGC Approved Sr.No.7180 Vidyawarta® April To June 2017 Issue-18, Vol-11 0125

भारतीय राज्यघटनेत समततेचे तत्व स्वीकारण्यात आले. तरीही समाजाने या तत्वाचा अंगीकार केलाच आहे असे म्हणणे उचित ठरणार नाही.

संदर्भ सूची

१) अशोक रामलिंग माळगे - समाज परिवर्तनवादी महात्मा बसवेश्वर - लेख २०१३

२) कृष्ण मेणसे - श्री बसवेश्वर ते श्री ज्ञानेश्वर एक चिंतन. लोक वाङमय गृह, मुंबई २०१२ पृ.क्र. ०३

३) डॉ.अशोक कामत - महात्मा बसवेश्वर काळ : व्यक्ती, वचन - साहित्य आणि शरणकार्य, सत्संग प्रतिष्ठान पुणे, १९९९ पृ.क्र.७२

४) उपरोक्त पृ.क्र.७२

५) उपरोक्त पृ.क्र.७३

६) अशोक रामलिंग माळगे - समान परिवर्तनवादी महात्मा बसवेश्वर लेख २०१३

७) उपरोक्त

८) कृष्णा मेणसे - श्री बसवेश्वर ते श्री ज्ञानेश्वर एक चिंतन, लोकवाडमयगृह मुंबई २०१२ पृ.क्र.७९

९) उपरोक्त पृ.क्र.८४

❑❑❑

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth 431516

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

29

# लोककवी वामनदादा कर्डक यांच्या गीतातील आंबेडकरी जाणीवा

प्रा. डॉ. तुळशीराम चंद्रसेन उकिरडे
मराठी विभाग, तेरणा महाविद्यालय, उस्मानाबाद

***********

भारतामध्ये अनेक जाती-धर्मांची लोक गुण्यागोविंदाने नांदताना दिसतात. भारतामध्ये अठरा पगड जाती असून सर्वधर्मांची लोक एकोप्याने वास्तव्य करतात. परंतु फार पूर्वीपासून जाती-जातीमध्ये तेढ निर्माण झालेले पहावयास मिळते. उच्च-निचतेचा भेदभाव मानवी मनामध्ये कोरलेला दिसून येतो. चातुर्वर्ण्य व्यवस्था भारतामध्ये निर्माण केलेली होती.ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि क्षुद्र या चार स्तरामध्ये हिंदू धर्मातील लोक विभागले गेले. ब्राह्मणाचा जन्म मुखातून, क्षत्रियांचा जन्म बाहूतून, वैश्यांचा जन्म बेंबीतून तर शुद्रांचा जन्म पायातून झाला अशी लोकधारणा समाजात निर्माण केली. वेद, मंत्र, पूजा-अर्चा ब्राह्मणाकडे, संरक्षणाचे कार्य क्षत्रियाकडे, गावातील कृषीपूरक गोष्टी वैश्याकडे तर सर्वात खालचे गुरे ओढणे, गावातील घाण साफ करणे, मेलेली गुरे ओढणे, झाडलोट करणे, इ. कामे शुद्राकडे होती. शुद्राकडे पाहण्याचा दृष्टीकोन वाईट होता. हिंदू धर्मामध्ये जातीची मुळे घट्ट कोरली गेली व मानवाच्या मनामध्ये ती धगधगत राहिली. मानूसच माणसाचा तिरस्कार करतो ही मानवी मनाला न पटणारी बाब आहे. समाजामध्ये सर्व मानव प्राणी समान आहेत. जगण्याचा सर्वांना समान अधिकार आहे. कोणी उच्च व कोणी नीच नसून भूतलावरील सर्व मानव एकच आहेत ही बाब महत्त्वपूर्ण आहे. परंतु जातीयतेचे विष मानवाच्या मनात एवढे कोरले गेले की मानवच मानवाचा शत्रू बनून तिरस्कार करू लागला. जातीयता विकोपाला गेली. भारतामध्ये मोठ्या संख्येने असणारा दलित समाज सामाजिक प्रवाहाबाहेर फेकला गेला. मंदिरामध्ये प्रवेश नाही, पाण्याला स्पर्श करायचा नाही, सार्वजनिक ठिकाणी प्रवेश बंदी, रस्त्यावर थुंकायचे नाही, गळ्यात मडके घेऊन गावात प्रवेश, कमरेला बोराटी अडकून चालायचं, ही दारूण अवस्था दलितांच्या वाट्याला आली.

१९६० ला दलित साहित्य प्रवाह सुरू झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने प्रभावित होवून अनेक लेखक लिहते